# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.12.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- राजस्थान सरकार स्थापनेच्या वर्षपुर्तीनिमित्त आज पंतप्रधानांच्या हस्ते 46 हजार कोटी रुपयांच्या विकासकामांची भेट
- एक देश एक निवडणूक यासंबंधातील दोन विधेयकं आज लोकसभेत चर्चेसाठी पटलावर
- मध्य प्रदेश आणि राजस्थानसह उत्तरेकडील अनेक राज्यात तीव्र थंडीची लाट

भारत आणि वेस्टइंडीज दरम्यान महिला क्रिकेट संघांदरम्यान आज दुसरा सामना नवी मुंबईत

आणि

- फ्रान्सच्या बेटाला चिडो चक्रीवादळाचा तडाखा, हजारो नागरिकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त

**पंतप्रधान**

राजस्थान राज्य सरकार स्थापनेला एक वर्ष झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंचप्रधान नरेंद्र मोदी आज जयपूरमधील एका कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. ४६ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या उर्जा, रस्ते, रेल्वे आणि पाणी या क्षेत्रातील २४ प्रकल्प पायाभरणी आणि उद्घटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ते एका जाहीर सभेलाही संबोधित करणार आहेत. राजस्थान आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री आणि काही केंद्रीय मंत्रीही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या प्रकल्पांमध्ये पूगलमध्ये 2 हजार मेगावॅट क्षमतेचा सौर पार्क आणि 1 हजार मेगावॅट क्षमतेच्या सोलर पार्कच्या दोन टप्प्यांचा आणि पिण्याच्या पाण्यासाठीच्या काही प्रकल्पांच्या विकासाची पायाभरणीही पंतप्रधान करणार आहेत.

**राष्ट्रपती**

भारत आणि श्रीलंका दरम्यान व्यापारी क्षेत्रातील दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी आणि उत्पन्नातील करांच्या संदर्भात वित्तीय चोरीला प्रतिबंध करण्यासाठी दोन्ही देशांमधील प्रोटोकॉल सुधारणा कराराची देवाणघेवाण केली. श्रीलंकेच्या नागरी सेवकांचे प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण करण्याबाबतही एक सामंजस्य करार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेच्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चेनंतर हे करार झाले. वर्ष 2022-2023 मध्ये 4 अब्ज डॉलर्सच्या मदतीसाठी राष्ट्रपती दिसानायके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. दोन्ही देश विविध भागातील दळणवळण प्रकल्पांचा पाठपुरावा करत आहेत, ज्यामध्ये दोन्ही देशांमधील बहु-उत्पादनाला चालना देणाऱ्या पेट्रोलियम पाइपलाइनचा समावेश आहे. अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मित्री यांनी काल माध्यमांशी बोलताना दिली.राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल दिसानायके यांच्या सन्मानार्थ राष्ट्रपती भवन इथं मेजवानीचं आयोजन केलं होतं. दोन्ही देशांदरम्यानचे संबंध दृढ करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

**राष्ट्रपती-दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आपल्या आंध्र प्रदेश दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती एम्स मंगलागिरीच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील आणि सिकंदराबाद येथील निलयम इथं विविध उपक्रमांची पायाभरणी करतील. राज्यातील मान्यवर, प्रमुख नागरिक आणि शिक्षणतज्ञ यांच्यासाठी निलयम इथं एका विशेष

कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून,  सिकंदराबादच्या कॉलेज ऑफ डिफेन्स मॅनेजमेंटला राष्ट्रपतींच्या हस्ते प्रेसिडेंस कलर प्रदान करण्यात येणार आहे.

**संसद**

लोकसभेत काल 2024-2025 साठीच्या अनुदानाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. 87 हजार 762 कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यासाठी सरकारनं संसदेची मंजुरी मागितली आहे. यापैकी, प्रस्तावांमध्ये कर्जे, दायित्वे आणि व्याजदरांच्या पुर्ततेसाठी एकंदर 44 हजार 142 कोटी रुपयांच्या रोख रकमेचा समावेश आहे. माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, किरकोळ विक्री क्षेत्र आणि बँकींग यांसारख्या क्षेत्रात गेल्या काही वर्षात वेतनवाढ झालेली नसल्याचा आरोप चर्चेला सुरुवात करताना काँग्रेसचे के सी वेणुगोपाल यांनी केला.

**राज्यसभा**

राज्यसभेत काल संविधानावरील चर्चेला सुरुवात झाली. केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांनी या चर्चेला प्रारंभ केला. राज्यघटना निर्माण करणाऱ्या सर्वांचं त्यांनी स्मरण केलं. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राज्यघटनेच्या रक्षणाच्या मुद्दयावरून त्यांनी विरोधकांवर टीका केली. विरोधी पक्ष नेते मल्लीकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल, शिवसेनेचे मिलिंद देवरा यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी आपले विचार मांडले. राज्यघटनेवर आजही सभागृहात चर्चा होणार आहे. भारतीय जनता पार्टीनं आपल्या खासदारांना पक्षादेश जारी केला आहे. एक देश एक निवडणूक यासंबंधातील दोन विधेयकं आज लोकसभेत चर्चेसाठी पटलावर ठेवण्यात येणार आहेत. भाजपानं आपल्या खासदारांनी सभागृहात उपस्थित राहण्यासाठी व्हिप जारी केला आहे. केंद्रिय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल 129 व्या घटना दरुस्ती विधेयक सादर करतील. एक देश एक निवडणूक या विषयावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारनं उच्च स्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीच्या सूचनांना स्वीकृती दिल्यानंतर हा प्रस्ताव सादर केला जात आहे.

**विजय दिवस**

देशभरात काल विजय दिन साजरा करण्यात आला. 1971च्या युद्धात भारतानं पाकिस्तानवर मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाची स्मृती म्हणून विजय दिन साजरा केला जातो. 1971 च्या युद्धात सेवा बजावणारे अधिकारी, एनसीसी छात्र, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. यंदा पुण्यात साजऱ्या होत असलेल्या लष्कर दिन आणि विजय दिनानिमित्त मुंबईतल्या कुलाबा इथून सुरू झालेल्या विजय दिन अल्ट्रा मॅरेथॉनचा समारोपही दक्षिण मुख्यालयात काल झाला.

**महाराष्ट्र विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित मंत्री, राज्यमंत्री आणि नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहाला परिचय करून दिला. त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी दोन्ही सभागृहात 35 हजार 788 कोटी 40 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यामध्ये 3 हजार 50 कोटी रुपये मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे कोटी, मोदी आवास घरकुल योजनेसाठी साडे बाराशे कोटी रुपये, सहकारी साखर कारखान्यांना कर्जाकरता सुमारे बाराशे कोटी रुपये यासारखे खर्च प्रस्तावित आहेत. सर्वाधिक सुमारे साडे सात हजार कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले जाणार आहेत.

**रशिया**

पश्चिमेकडील देश रशियाबद्दल अफवा पसरवण्याचा प्रयत्न करत असून रशियाकडून धोका असल्याचं सांगून नागरिकांमध्ये घबराट पसरवण्याचा प्रयत्न होत असल्यानं त्यांना प्रत्युत्तर देण्याला आपल्याला भाग आहे. असं रशियाचं राष्ट्रध्यध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी काल मॉस्को इथं सांगितलं. रशियन संरक्षण मंत्रालयातील कॉलेजियमच्या काल बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते.

**युरिया**

जागतिक स्तरावर युरियाच्या किमती वाढल्या असल्या तरी केंद्र सरकार शेतकऱ्यांना कमी दरांत युरिया वितरीत करत आहे. नवीन तंत्रज्ञानावर आधारित क्रेडीट गॅरंटी योजनेची सुरवात काल त्यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं झाली. त्यावेळी ते बोलत होते. ही योजना वखार विकास आणि नियामक प्राधिकरण मान्यताप्राप्त गोदामांमध्ये शेतीउत्पादन जमा केल्यानंतरची पावती अर्थात e-NWR साठी शेतकऱ्यांच्या पीक उत्पन्न काढणीनंतरच्या वित्तपुरवठ्यासाठी एक हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. अशी माहिती अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे दिली आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि वेस्टइंडीज संघांदरम्यान 20 षटकांचा दुसरा सामना आज नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं वेस्टइंडीजवर 49 धावांनी मात केली. वेस्टइंडीजचा महिला क्रिकेट संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून या दौऱ्यात दोन्ही संघ 20 आणि 50 षटकांचे प्रत्येकी तीन सामने खेळणार आहेत.

**क्रिकेट**

बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या ब्रिस्बेन कसोटीमध्ये यजमान ऑस्ट्रेलियानं आपल्या पहिल्या डावात सर्व गडी बाद 445 धावा केल्या आहेत.  सामन्याच्या कालच्या तिसऱ्या दिवसअखेर पहिल्या डावात भारताच्या 4 गडी बाद 51 धावा झाल्या होत्या; चौथ्या दिवसाचा खेळ सुरू झाला असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या  6  गडी बाद 167 धावा झाल्या आहेत.

**चक्रीवादळ**

चिडो चक्रीवादळानं मादागास्कर आणि मोझांबिक किनाऱ्यादरम्यान असलेल्या मायोट या फ्रान्सच्या बेटाला जबरदस्त तडाखा दिला असून, इथं हजारो लोकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वीस लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली असली, तरी स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते बळींची संख्या एक हजार किंवा त्याहून अधिक असण्याची शक्यता आहे. ताशी 225 किमी वेगाने वारे असलेले आणि आठ मीटर उंचीच्या लाटांसह हे शक्तिशाली वादळ शनिवारी या भागात धडकलं. त्यामुळं मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून, वीजपुरवठा खंडीत झाला आहे. या बेटावरील हा 90 वर्षांतील सर्वांत भीषण आघात आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन राष्ट्रीय शोक कालावधी जाहीर करण्याची घोषणा केली आहे. उच्च राहणीमान आणि फ्रान्सच्या कल्याणकारी योजनामुळं कोमोरोस आणि सोमालिया सारख्या शेजारील देशांतील लोक मोठ्या प्रमाणात या बेटावर स्थलांतरित होत असतात.

**वायू प्रदूषण**

दिल्लीतील वाढत्या वायू प्रदूषणामुळं सर्व प्राथमिक शाळांमध्ये हायब्रिड पद्धतीनं म्हणजे ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीनं शाळा चालवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इयत्ता पाचवीपर्यंतचे वर्ग ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीनं ज्याप्रमाणं शाळांना सोयीचे असेल, त्याप्रमाणे घ्यावेत, असा आदेश शिक्षण संचालनालयानं दिला आहे. दिल्ली एनसीआर प्रदेशात हवेची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट झाली असून, वायू गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं चौथ्या टप्प्यातील ग्रॅप लागू केला आहे.

मध्य प्रदेश आणि राजस्थानसह उत्तरेकडील अनेक राज्यात आजपासून पुढील 2 ते 3 दिवस तीव्र थंडीची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उत्तरेकडील सिक्कीम, आसाम आणि मेघालयमध्ये धुकं राहील. तमिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, आंध्र प्रदेशची किनारपट्टी आणि रायलसीमा भागात वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,नमस्कार